# प्रेसनोट

दि. २३/०७/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून दौंड नगरपरिषद येथील नगररचना सहायक यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३६ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. विजयकुमार मधुकर हावशेट्टे, वय ३१ वर्ष, पद – नगररचा सहायक, दौंड नगरपरिषद, जि. पुणे. (वर्ग-२, अराजपत्रित) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,००,०००/- (चार लाख) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३,५०,०००/- (तीन लाख पन्नास हजार) रुपये |
| लाच मागणी पडताळणी दिनांक | १४/०१/२०२५ |
| ठिकाण | देवपाम गृहनिर्माण सोसायटी, दौंड, जि. पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. रुपेश जाधव, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९८६७५११६९४) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी बीपीसीएल कंपनी कडे पेट्रोलपंप डीलरशिप साठी अर्ज केला आहे पेट्रोलपंप उभारणी करता आवश्यक असलेली जागा त्यांनी मौजे दौंड सर्वे नंबर २०२/८ ही जागा ही श्री. लालचंद लुंड, वय ७३ वर्ष यांच्या मालकीची असून सदर जागा तक्रारदाराने वीस वर्षाच्या भाडेपट्ट्याने घेतलेली आहे.

नमूद जागेवर पेट्रोलपंप उभारणी करता दौंड नगर परिषदेची NA परवानगी व बांधकाम परवाना आवश्यक असल्याने श्री. लुंड यांनी तो मिळण्याकरता दौंड नगरपरिषदेकडे दि. ०२/०१/२०२५ रोजी अर्ज केला आहे. श्री लुंड हे वयोवृद्ध असल्याने नमूद अर्जाचे पुढील काम पाहण्यासाठी त्यांनी तक्रारदार यांना कुलमुखत्यार पत्र दिले आहे.

दि. ०३/०१/२०२५ रोजी दौंड नगरपरिषदेचे नगररचना सहायक लोकसेवक श्री. विजयकुमार हावशेटटे यांनी जागेवर समक्ष जाऊन जागेची पाहणी करून झाल्यानंतर पेट्रोल पंपासाठी आवश्यक असणारा सर्वे अहवाल तसेच टेनटिट्यूव लेआउट, फायनल लेआउट आणि बांधकाम परवाना देण्याकरता तक्रार यांच्याकडे २ लाख रुपयाच्या लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि. १०/०१/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १४/०१/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता त्यादरम्यान यातील लोकसेवक श्री. विजयकुमार हावशेट्टे, नगररचना सहाय्यक, दौड नगरपरिषद यांनी पंचासमक्ष तक्रारदाराकडे त्यांच्या नियोजित पेट्रोलपंपासाठी लागणारे टेनटिट्यूव लेआउट, फायनल लेआउट मंजूर करून देण्याकरता स्वतःसाठी आणि दौंड नगरपरिषदेचे तत्कालिन मुख्याधिकारी श्री. विजय कावळे यांच्यासाठी सुरुवातीला ४ लाख रुपयाची लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३,५०,००० (तीन लाख पन्नास हजार) रुपयाची लाच मागणी करुन, ती लाच रक्कम स्विकारण्याचे केल्याचे निष्पन्न झाल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री विजयकुमार हावशेट्टे यांच्याविरुद्ध दिलेल्या तक्रारीवरून दौंड पोलिस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७ अ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया येथे चालू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. ९८२३१३७१५४) व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. ९९२१९१०३५७) यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते

Scanned with CamScanner